महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक-एमडीआर-१३२१/प्र.क्र.२५१/२०२३/२९-अ दिनांक - १८ ऑक्टोबर, २०२४

# -: प्रसिद्धीपत्रक :-

**विषय:**- सहायक प्राध्यापक, औषधशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा गट-ब, सातारा.
**संदर्भ :**-जाहिरात क्रमांक २५५/२०२३

सहायक प्राध्यापक, औषधशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा गट-ब, सातारा, या पदाच्या मुलाखती दिनांक ०६मार्च,२०२४ रोजी घेण्यात आल्या होत्या. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अनुसार राज्याच्या नियंत्रणाखालील पदांवरील नियुक्तीकरीता तरतुद विहित करण्यात आली असून, सदर अधिनियमातील तरतुदी जाहिरातींकरीता लागू असल्याने उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने शासनाकडून सुधारीत मागणीपत्रे मागविण्यात आली होती. आयोगाद्वारे दिनांक ०४ सप्टेंबर,२०२४ रोजी सदर जाहिरातींसाठी शुद्धीपत्रकात आरक्षण नमूद करून उमेदवारांना नव्याने अर्ज करण्यासंदर्भात शुध्दीपत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. तथापि, शुद्धीपत्रकास अनुसरून एकाही उमेदवाराचा अर्ज आयोगास प्राप्त झाला नाही. त्यानुषंगाने दिनांक ०६ मार्च,२०२४ रोजी घेण्यात आलेल्या मुलाखतीनुसार विचाराधीन पदाचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर दिनांक १८ ऑक्टोबर, २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आला आहे.

ठिकाण :- नवी मुंबई

उपसचिव (सरळसेवा - निकाल)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग